Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# मराठवाड्यातील पीक प्रारुपाचा भौगोलिक अभ्यास

उध्दव प्रल्हाद पोगलवार
संशोधक विद्यार्थी
भूशास्त्र संकुल
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ नांदेड
pogalwar.28@gmail.com

प्रा.डॉ.पस्तापुरे बी.एन.
संशोधक मार्गदर्शक
भूगोल विभाग
इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय सिडको,
नांदेड.
pastapurebhagwat@gmail.com

**सारांश :**

मराठवाडा विभाग हा महाराष्ट्रातील मध्यवर्ती विभाग असून येथील प्रमुख व्यवसाय हा कृषी आहे. प्रस्तुत संशोधन लेखामध्ये मराठवाड्यातील पीक प्रारुपाचा अभ्यास करण्यात आला आहे. मराठवाडा विभगात प्रामुख्याने अन्नधान्य पिके गहु, ज्वारी, बाजरी, मका ही आहेत. कडधान्य पिके हरभरा, तुर, मुग, उडीद आहेत.गळीतधान्य पिके भुईमुग, करडई, सुर्यफुल, सोयाबीन इ.आहेत. ऊस व कापुस ही नगदी पिके मोठ्याप्रमाणावर घेतली जातात. मराठवाडा विभागातील पर्जन्यमान हे बेभरवशाचे असल्याने पिक प्रारुपावर त्याचा परिणाम होऊन त्यात बदल घडुन येतो. जलसिंचनाची सोय उपलब्ध आहे त्याठिकाणी बागायती कृषीक्षेत्राचा विकास झालेला आहे.या विभागात कापुस व ज्वारी पिकाचे क्षेत्र जास्त आहे.

**बिजसंज्ञा : पीक प्रारुप, पिकक्षेत्र, धनात्मक बदल, ऋणात्मक बदल**

## प्रस्तावना :

पीक प्रारुप म्हणजे “विशिष्ट क्षेत्रात विशिष्ट वेळेला वेगवेगळ्या पिकाखालील असलेले क्षेत्राचे प्रमाण म्हणजेच पीक प्रारुप होय.” पीक प्रारुपावर शेतकरी वर्गाच्या आवडीनिवडीच्या परिणामा बरोबरच पर्जन्यमान शेत आकार मालकी हक्क बाजारपेठ सिंचनाची उपलब्धता या सर्व गोष्टींचा प्रभाव पडतो. पीक प्रारुप हे स्थलकालसापेक्ष असते म्हणजे ते वेळ व स्थानानुसार बदलत राहते. पीक प्रारुप हे प्रदेशा प्रदेशानुसार विभिन्न प्रकारचे असते. पीक प्रारुपाच्या अभ्यासावरुन कृषी विभाग पाडता येतात त्याचा उपयोग हा एखाद्या प्रदेशाचे नियोजन करतांना नियोजनकारांना होत असतो. २०११ च्या जनगणनेनुसार मराठवाड्यातील ३८.३६ टक्के शेतकरी व ३५.८१ टक्के शेतमजुराचे प्रमाण आहे.आजही मराठवाड्यातील लोकांचे उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन शेती हेच आहे.

## संशोधन उद्दिष्ट

१. मराठवाडा विभागातील पीक प्रारुप अभ्यासणे.
२. मराठवाडा विभागातील पीक प्रारुपात झालेला बदल जाणुन घेणे.

## संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधन लेखासाठी व्दितीय साधनांचा वापर करण्यात आला असुन मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांचे सामाजिक व आर्थिक समालोचन अभ्यासण्यात आले. मिळालेल्या आकडेवारीवर सांखिकी प्रक्रिया करुन त्यावर पीक प्रारुप या सुत्राच्या सहायाने पीक प्रारुप काढण्यात आले आहे.

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

पीक प्रारुप सुत्र :

$$Cp = \frac{Ca}{N}$$

Cp = पीक प्रारुप Cropping Pattern

Ca = अभ्यास क्षेत्रातील अ पिकाखालील क्षेत्र

N = अभ्यासासाठी निवडलेल्या प्रदेशातील एकुण पिकाखालील क्षेत्र

## मराठवाड्यातील पीक प्रारुप —१९९०—९१ ते २०१०—११ झालेला प्र. बदल टक्केवारी

| पिक | वर्ष/जिल्हा | औरंगाबाद | जालना | बीड | लातुर | उस्मनाबाद | नांदेड | परभणी हिंगोली | एकुण | फरकाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १.गहु | १९९०.९१ | ३९८६७ | ३८५७६ | ३१८८४ | २३७४४ | १९३९७ | २४८९५ | ४२९५३ | २२१३१६ | |
| | | १८.०१ | १७.४३ | १४.४ | १०.७२ | ८.७६ | ११.२४ | १९.४ | १०० | |
| | झालेला प्र. बदल | —०.९५ | —४.५७ | —११.८९ | +४.६५ | +०.९१ | —१.२२ | +१३.०७ | | +१६.९८ |
| | २०१०.११ | ४५५०० | ३४३०० | ६७०० | ४१००० | २५७९७ | २६७२० | ८६५८९ | २६६६०६ | |
| | | १७.०६ | १२.८६ | २.५१ | १५.३७ | ९.६७ | १०.०२ | ३२.४७ | १०० | |
| २.ज्वारी | १९९०.९१ | २९४२०५ | २०८१३२ | ३८५८६० | २३८२७१ | २४७७२१ | २७००१९ | ४००६९५ | २०४४९०३ | |
| | | १४.३८ | १०.१७ | १८.८६ | ११.६५ | १२.११ | १३.२ | १९.५९ | १०० | |
| | झालेला प्र. बदल | —७.९१ | —२.१५ | —०.१२ | —०.५३ | +१२.७२ | +२.३६ | +०.३७ | | —३३.५८ |
| | २०१०.११ | ८७९०० | १०९००० | २००२०० | १५११०० | ३३७३१५ | २११४०० | २६११२१ | १३५८०३६ | |
| | | ६.४७ | ८.०२ | १४.७४ | ११.१२ | २४.८३ | १५.५६ | १९.२२ | १०० | |
| ३.बाजरी | १९९०.९१ | १८७११५ | ७३५२३ | १६४३५४ | १११४६ | ११२२८ | १७३६ | ८९४७ | ४५८०४९ | |
| | | ४०.८५ | १६.०५ | ३५.८८ | २.४३ | २.४५ | ०.३७ | १.९५ | १०० | |
| | झालेला प्र. बदल | —१०.०८ | —३.६८ | +९.९१ | —०.७६ | +४.५७ | —०.२ | +२.२१ | | —३६.२९ |
| | २०१०.११ | ८९८०० | ३६१०० | १३३६४६ | ४९०० | २०५१० | ५०२ | ६३५२ | २९१८१० | |
| | | ३०.७७ | १२.३७ | ४५.७९ | १.६७ | ७.०२ | ०.१७ | २.१६ | १०० | |
| ४.मका | १९९०.९१ | ९४८० | ३१२५ | ४५५७ | ३२६३ | ४८६६ | ४४४ | १०५१ | २६७८६ | |
| | | ३५.३९ | ११.६६ | १७.०१ | १२.१८ | १८.१६ | १.६५ | ३.९२ | १०० | |
| | झालेला प्र. बदल | +२३.४३ | +१६.०९ | —१२.०४ | —१०.०१ | —१३.४९ | —१.१७ | —२.७४ | | +८८.६१ |
| | २०१०.११ | १३८४०० | ६५३०० | ११७०० | ४९०० | ११००९ | ११४४ | २८०५ | २३५२५८ | |
| | | ५८.८२ | २७.७५ | ४.९७ | २.०८ | ४.६७ | ०.४८ | १.१८ | १०० | |
| ५.हरभरा | १९९०.९१ | ४६९४९ | १२७६६ | २३१३१ | २८८७५ | २२८४६ | १५०४७ | ४११३० | १९०७४४ | |
| | | २४.६१ | ६.६९ | १२.१२ | १५.१३ | ११.९७ | ७.८८ | २१.५६ | १०० | |
| | झालेला प्र. बदल | —१३.२८ | +०.६३ | +६.०० | +५.०९ | +३.७५ | —०.८९ | —१.३१ | | +४८.६३ |
| | २०१०.११ | ४२१०० | २७२०० | ६७३०० | ७५१०० | ५८४०९ | २५९८५ | ७५२३५ | ३७१३२९ | |
| | | ११.३३ | ७.३२ | १८.१२ | २०.२२ | १५.७२ | ६.९९ | २०.२५ | १०० | |
| ६.तुर | १९९०.९१ | ५१९१९ | ३६०३७ | ५१५१३ | २२६६८ | ८५०९६ | ४३३०९ | ७७५६९ | ३६८१११ | |
| | | १४.१ | ९.७८ | १३.९९ | ६.१५ | २३.११ | ११.७६ | २१.०७ | १०० | |
| | झालेला प्र. बदल | —२.११ | +२.७८ | —१.२६ | +१२.१९ | —६.९९ | —१.४४ | —१.४८ | | +२७.३९ |
| | २०१०.११ | ६०८०० | ६३७०० | ५६०६७ | ९३००० | ८१७२८ | ५२३३२ | ९९३४५ | ५०६९७२ | |
| | | ११.९९ | १२.५६ | ११.०५ | १८.३४ | १६.१२ | १०.३२ | १९.५९ | १०० | |
| ७.मुग | १९९०.९१ | २७६७८ | ६८०८६ | ३३२५३ | ६९३३५ | १६३७१ | ३२६१० | ९०५९७ | ३३७९३० | |
| | | ८.१९ | २०.१४ | ९.८४ | २०.५१ | ४.८४ | ९.६४ | २६.८ | १०० | |
| | झालेला प्र. बदल | —३.५२ | —१.१२ | —७.२६ | —९.१९ | +४.१२ | +६.४७ | +१०.५ | | —२९.७ |
| | २०१०.११ | ११९०० | ४५२०० | ६१४९ | २६९०० | २१२९० | ३८२७२ | ८८६२४ | २३७५३५ | |
| | | ४.६७ | १९.०२ | २.५८ | ११.३२ | ८.९६ | १६.११ | ३७.३ | १०० | |
| ८.उडीद | १९९०.९१ | १८६१८ | २४८३९ | ० | ३६३८३ | ० | १४४३७ | १६२५२ | ११०५२९ | |
| | | १६.८४ | २२.४७ | ० | ३२.९१ | ० | १३.०६ | १४.७ | १०० | |
| | झालेला प्र. बदल | —१५.२३ | —१५.७३ | +५.२८ | —१४.३९ | +२२.१३ | +१३.०२ | —२.०९ | | +५५.१३ |
| | २०१०.११ | ३८०० | १५९०० | १२४७४ | ६०२०० | ५२२०३ | ६१५२० | २९७६३ | २३५८६० | |

| पिक | वर्ष/जिल्हा | औरंगाबाद | जालना | बीड | लातुर | उस्मनाबाद | नांदेड | परभणी हिंगोली | एकुण | फरकाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १.६१ | ६.७४ | ५.२८ | २५.५२ | २२.१३ | २६.०८ | १२.६१ | १०० | |
| ९.भुइमुग | १९९०.९१ | १७३३१ | १२९९१ | ३३८४५ | ३२१२२ | २२७६५ | २४५७० | ५६२६२ | १९९८८६ | |
| | | ८.६७ | ६.४९ | १६.९३ | १६.०७ | ११.३८ | १२.२९ | २८.१४ | १०० | |
| | झालेला प्र. बदल | —३.३९ | —६.३२ | .... | —१४.१ | —३.८७ | —३.०४ | +४७.६२ | | —४४.१४ |
| | २०१०.११ | ५९०० | २०० | उ.ना. | २२०० | ८३९४ | १०३३६ | ८४६२० | १११६५० | |
| | | ५.२८ | ०.१७ | उ.ना. | १.९७ | ७.५१ | ९.२५ | ७५.७६ | १०० | |
| १०.करडइ | १९९०.९१ | ७३५४२ | ६१३६४ | ४१६९५ | १७००४ | २३४६२ | १०१८७ | ८२१७२ | ३०९४२६ | |
| | | २३.७६ | १९.८३ | १३.४७ | ५.४९ | ७.५८ | ३.२९ | २६.५५ | १०० | |
| | झालेला प्र. बदल | —२१.९२ | —१२.८२ | ... | +८.७२ | +२२.५ | +३.६३ | +१३.३६ | | —६४.९८ |
| | २०१०.११ | २००० | ७६०० | उ.ना. | १५४०० | ३२६०४ | ७५०० | ४३२६० | १०८३६४ | |
| | | १.८४ | ७.०१ | उ.ना. | १४.२१ | ३०.०८ | ६.९२ | ३९.९१ | १०० | |
| ११.सुर्यफुल | १९९०.९१ | ० | १०५७३ | ५९९३४ | १०६१३ | ० | ३४४०९ | ० | ११५५२९ | |
| | | ० | ९.१५ | ५१.८७ | ९.१८ | ० | २९.७८ | ० | १०० | |
| | झालेला प्र. बदल | +२.०१ | —८.१९ | .. | +१२.४१ | +५५.१३ | —१७.२३ | +७.७२ | | —१.४१ |
| | २०१०.११ | २३०० | ११०० | उ.ना. | २४६०० | ६२७९९ | १४२९७ | ८८०० | ११३८९६ | |
| | | २.०१ | ०.९६ | उ.ना. | २१.५९ | ५५.१३ | १२.५५ | ७.७२ | १०० | |
| १२.सोयाबीन | १९९०.९१ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| | | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| | झालेला प्र. बदल | +१.८७ | +११.३४ | + उ.ना. | उ.ना. | +४०.६४ | ० | +४६.१२ | | +१०० |
| | २०१०.११ | ७७०० | ४६५०० | उ.ना. | उ.ना. | १६६५१९ | ० | १८९००० | ४०९७१९ | |
| | | १.८७ | ११.३४ | उ.ना. | उ.ना. | ४०.६४ | ० | ४६.१२ | १०० | |
| १३.उस | १९९०.९१ | ३३२७४ | १११८५ | २२००१ | १४३९९ | २४९४९ | १५८८२ | १४६१८ | १३६३०८ | |
| | | २४.४१ | ८.२ | १६.१४ | १०.५६ | १८.३ | ११.६५ | १०.७२ | १०० | |
| | झालेला प्र. बदल | —१२.३४ | +४.७२ | ... | +१७.७४ | —१.०२ | —०.३५ | +६.६७ | | +४.२७ |
| | २०१०.११ | १७२०० | १८४०८ | उ.ना. | ४०३०० | २४६१४ | १७१०० | २४७८० | १४२४०२ | |
| | | १२.०७ | १२.९२ | उ.ना. | २८.३ | १७.२८ | १२.०० | १७.३९ | १०० | |
| १४.कापुस | १९९०.९१ | ६३३१३ | १०६८२३ | २३५६२ | २३५०० | ० | २३४८५९ | २६५९८७ | ७१८०४४ | |
| | | ८.८१ | १४.८७ | ३.२८ | ३.२७ | ० | ३२.७ | ३७.०४ | १०० | |
| | झालेला प्र. बदल | +२०.४ | +९.७६ | .... | —२.८८ | +०.१६ | —११.७९ | —१२.३६ | | ३८.८६ |
| | २०१०.११ | ३४३१०० | २८९३०० | उ.ना. | ४६०० | १८९६ | २४५७०० | २८९९३३ | ११७४५२९ | |
| | | २९ण२१ | २४.६३ | उ.ना. | ०.३९ | ०.१६ | २०.९१ | २४.६८ | १०० | |

स्त्रोत .औरंगाबाद,जालना,बीड,लातुर,उस्मानाबाद,नांदेड,परभणी,हिंगोली जिल्ह्यांचे सामाजिक व आर्थिक समालोचन १९९३.९४ व २०१०.११

वरिल तक्त्यानुसार मराठवाडयातील पिक प्रारुप व त्यात झालेले बदल खलीलप्रमाणे आढळुन आले.

### १.गहु पिकाखालील क्षेत्र व झालेला बदल

१९९०—९१ या वर्षात मराठवाडयातील गहु पिकाखालील क्षेत्रापैकी सर्वाधिक क्षेत्र परभणी जिल्हयात १९.४ टक्के तर सर्वात कमी पिकक्षेत्र उस्मनाबाद जिल्ह्यात ८.७६ टक्के होते. २०१०.११ मध्ये सर्वाधिक क्षेत्र परभणी जिल्हयात ३२.४७ टक्के तर सर्वात कमी पिकक्षेत्र बिड जिल्ह्यात २.५१ टक्के होते. १९९०.९१ ते २०१०.११ या वर्षात धनात्मक बदल + झालेले जिल्हे परभणी +१३.०७ टक्के,लातुर +४.६५ टक्के,उस्मनाबाद +०.९१ टक्के होउन पिकक्षेत्रामध्ये वाढ झाली. ऋणात्मक बदल— झालेल्या जिल्ह्यात बीड —११.८९ टक्के, जालना —४.५७ टक्के, नांदेड —१.२२ टक्के, औरंगाबाद —०.९५ टक्के होउन पिकक्षेत्रामध्ये घट झाली. मराठवाडयातील गहु पिकाखालील क्षेत्रामध्ये एकुण वाढ +१६.९८ टक्के वाढ झाली.

### २. ज्वारी पिकाखालील क्षेत्र व झालेला बदल

१९९०—९१ या वर्षात मराठवाडयातील ज्वारी पिकाखालील क्षेत्रापैकी सर्वाधिक क्षेत्र परभणी जिल्हयात १९.५९ टक्के तर सर्वात कमी पिकक्षेत्र जालना जिल्ह्यात १०.१७ टक्के टक्के होते. २०१०.११

मध्ये सर्वाधिक क्षेत्र उस्मनाबाद जिल्हयात २४.८३ टक्के तर सर्वात कमी औरंगाबाद जिल्ह्यात ६.४७ टक्के पिकक्षेत्र होते. १९९०.९१ ते २०१०.११ या वर्षात धनात्मक बदल होउन ज्वारी पिकक्षेत्रामध्ये वाढ झालेले जिल्ह्यात उस्मनाबाद +१२.७२ टक्के, नांदेड +२.३६ टक्के, परभणी +०.३७ टक्के बदल होउन पिकक्षेत्रामध्ये वाढ झाली. ऋणात्मक बदल झालेल्या जिल्ह्यात औरंगाबाद —७.९१ टक्के ,जालना —२.१५ टक्के ,बीड —०.१२टक्के ,लातुर —०.५३ टक्के बदल होउन पिकक्षेत्रामध्ये घट झाली. मराठवाडयातील एकुण ज्वारी पिकाखालील क्षेत्रामध्ये —३३.५८ टक्के घट झाली.

**३.बाजरी पिकाखालील क्षेत्र व झालेला बदल**

१९९०—९१ या वर्षात मराठवाडयातील बाजरी पिकाखालील क्षेत्रापैकी सर्वाधिक पिकक्षेत्र औरंगाबाद जिल्हयात ४०.८५ टक्के तर सर्वात कमी पिकक्षेत्र नांदेड जिल्ह्यात ०.३७ टक्के टक्के होते.२०१०.११ मध्ये सर्वाधिक पिकक्षेत्र बीड जिल्हयात ४५.७९ टक्के तर सर्वात कमी पिकक्षेत्र नांदेड जिल्ह्यात ०.१७ टक्के होते. १९९०.९१ ते २०१०.११ या वर्षात धनात्मक बदल होउन बाजरी पिकक्षेत्रामध्ये वाढ झालेले जिल्ह्यात बीड +९.९१ टक्के ,उस्मनाबाद +४.५७ टक्के ,परभणी +०.२१ टक्के बदल होउन पिकक्षेत्रामध्ये वाढ झाली. ऋणात्मक बदल झालेल्या जिल्ह्यात औरंगाबाद —१०.०८ टक्के ,जालना —३.६८ टक्के ,नांदेड —०.२ टक्के बदल होउन पिकक्षेत्रामध्ये घट झाली. मराठवाडयातील एकुण बाजरी पिकाखालील क्षेत्रामध्ये —३६.२९ टक्के घट झाली.

**४.मका पिकाखालील क्षेत्र व झालेला बदल**

१९९०—९१ या वर्षात मराठवाडयातील मका पिकाखालील क्षेत्रापैकी सर्वाधिक पिकक्षेत्र औरंगाबाद जिल्हयात ३५.३९ टक्के तर सर्वात कमी पिकक्षेत्र नांदेड जिल्ह्यात १.६५ टक्के होते. २०१०.११ मध्ये सर्वाधिक पिकक्षेत्र औरंगाबाद जिल्हयात ५७.७२ टक्के तर सर्वात कमी पिकक्षेत्र नांदेड जिल्ह्यात ०.४८ टक्के होते. १९९०.९१ ते २०१०.११ या वर्षात धनात्मक बदल होउन मका पिकक्षेत्रामध्ये वाढ झालेले जिल्ह्यात औरंगाबाद +२३.४३ टक्के,जालना +१६.०९ टक्के बदल होउन पिकक्षेत्रामध्ये वाढ झाली. ऋणात्मक बदल झालेल्या जिल्ह्यात उस्मनाबाद —१३.४९ टक्के ,बीड —१२.०४ टक्के,लातुर —१०.०१ टक्के,परभणी —२.७४ टक्के,नांदेड —१.१७ टक्के बदल होउन पिकक्षेत्रामध्ये घट झाली. मराठवाडयातील एकुण मका पिकाखालील क्षेत्रामध्ये +८८.६१ टक्के घट झाली.

**५.हरभरा पिकाखालील क्षेत्र व झालेला बदल**

१९९०—९१ या वर्षात मराठवाडयातील हरभरा पिकाखालील क्षेत्रापैकी सर्वाधिक पिकक्षेत्र औरंगाबाद जिल्हयात २४.६१ टक्के तर सर्वात कमी पिकक्षेत्र जालना जिल्ह्यात ६.६९ टक्के होते.२०१०.११ मध्ये सर्वाधिक पिकक्षेत्र परभणी जिल्हयात २०.२५ टक्के तर सर्वात कमी पिकक्षेत्र नांदेड जिल्ह्यात ६.९९ टक्के होते. १९९०.९१ ते २०१०.११ या वर्षात धनात्मक बदल होउन हरभरा पिकक्षेत्रामध्ये वाढ झालेले जिल्ह्यांमध्ये बीड जिल्हयात +६ टक्के ,लातुर +५.०९ टक्के ,उस्मनाबाद +३.७५ टक्के ,जालना +०.६३ टक्के हरभरा पिकक्षेत्रामध्ये वाढ झाली. ऋणात्मक बदल झालेल्या जिल्ह्यात औरंगाबाद—१३.२८ टक्के ,परभणी —१.३१ टक्के पिकक्षेत्रामध्ये घट झाली. मराठवाडयातील एकुण हरभरा पिकाखालील क्षेत्रामध्ये +४८.६३ टक्के वाढ झाल्याचे निदर्शनास आले.

### ६. तुर पिकाखालील क्षेत्र व झालेला बदल

१९९०—९१या वर्षात मराठवाडयातील तुर पिकाखालील क्षेत्रापैकी सर्वाधिक पिकक्षेत्र उस्मानाबाद जिल्हयात २३.११ टक्के तर सर्वात कमी पिकक्षेत्र लातुर जिल्ह्यात ६.१५ टक्के होते. २०१०.११ मध्ये सर्वाधिक पिकक्षेत्र परभणी जिल्हयात १९.५९ टक्के तर सर्वात कमी पिकक्षेत्र नांदेड जिल्ह्यात १०.३२ टक्के होते. १९९०.९१ ते २०१०.११ या वर्षात धनात्मक बदल होउन तुर पिकक्षेत्रामध्ये वाढ झालेले जिल्ह्यांमध्ये लातुर +१२.१९ टक्के ,जालना +२.९८ टक्के तुर पिकक्षेत्रामध्ये वाढ झाली. ऋणात्मक बदल होउन उस्मानाबाद —६.९९ टक्के ,औरंगाबाद —२.११ टक्के, परभणी —१.४८ टक्के ,बीड —१.२६ टक्के तुर पिकक्षेत्रामध्ये घट झाल्याचे दिसुन आले. मराठवाडयातील एकुण तुर पिकाखालील क्षेत्रामध्ये +२७.३९ टक्के वाढ झाल्याचे निदर्शनास आले.

### ७.मुग पिकाखालील क्षेत्र व झालेला बदल

१९९०—९१या वर्षात मराठवाडयातील मुग पिकाखालील क्षेत्रापैकी सर्वाधिक पिकक्षेत्र परभणी जिल्हयात २६.८ टक्के तर सर्वात कमी पिकक्षेत्र उस्मानाबाद जिल्ह्यात ४.८४ टक्के होते.२०१०.११ मध्ये सर्वाधिक पिकक्षेत्र परभणी जिल्हयात ३७.३ टक्के तर सर्वात कमी पिकक्षेत्र बीड जिल्ह्यात २.५८ टक्के होते. १९९०.९१ ते २०१०.११ या वर्षात धनात्मक बदल होउन मुग पिकक्षेत्रामध्ये वाढ झालेल्या जिल्ह्यांमध्ये परभणी +१०.५ टक्के ,नांदेड +६.४७ टक्के ,उस्मनाबाद +४.१२ टक्के मुग पिकक्षेत्रामध्ये वाढ झाली. ऋणात्मक बदल होउन लातुर —९.१९ ,बीड —७.२६ टक्के, औरंगाबाद —३.५२ टक्के ,जालना —१.१२ टक्के मुग पिकक्षेत्रामध्ये घट झाल्याचे दिसुन आले. मराठवाडयातील एकुण मुग पिकाखालील क्षेत्रामध्ये —२९. ७० टक्के घट झाल्याचे निदर्शनास आले.

### ८.उडीद पिकाखालील क्षेत्र व झालेला बदल

१९९०—९१या वर्षात मराठवाडयातील उडीद पिकाखालील क्षेत्रापैकी सर्वाधिक पिकक्षेत्र लातुर जिल्हयात ३२.९१टक्के तर सर्वात कमी पिकक्षेत्र बीड व उस्मानाबाद जिल्ह्यात होते.२०१०.११ मध्ये सर्वाधिक पिकक्षेत्र नांदेड जिल्हयात २६.०८ टक्के तर सर्वात कमी पिकक्षेत्र औरंगाबाद जिल्ह्यात १.६१ टक्के होते. १९९०.९१ ते २०१०.११ या वर्षात धनात्मक बदल होउन उडीद पिकक्षेत्रामध्ये वाढ झालेल्या जिल्ह्यांमध्ये उस्मनाबाद +२२.१३ टक्के, नांदेड +१३.०२ टक्के ,बीड +५.२८ टक्के पिकक्षेत्रामध्ये वाढ झाली. ऋणात्मक बदल होउन जालना —१५.७३ टक्के ,औरंगाबाद —१५.२३ टक्के, लातुर —१४.३९ टक्के ,परभणी —२.०९ टक्के उडीद पिकक्षेत्रामध्ये घट झाल्याचे दिसुन आले. मराठवाडयातील एकुण उडीद पिकाखालील क्षेत्रामध्ये +५३.१३ टक्के वाढ झाल्याचे निदर्शनास आले.

### ९. भुईमुग पिकाखालील क्षेत्र व झालेला बदल

१९९०—९१या वर्षात मराठवाडयातील भुईमुग पिकाखालील क्षेत्रापैकी सर्वाधिक पिकक्षेत्र लातुर जिल्हयात ३२.९१ टक्के तर सर्वात कमी पिकक्षेत्र बीड व उस्मानाबाद जिल्ह्यात होते. २०१०.११ मध्ये सर्वाधिक पिकक्षेत्र परभणी जिल्हयात ७५.७६ टक्के तर सर्वात कमी पिकक्षेत्र जालना जिल्ह्यात ०.१७ टक्के होते. १९९०.९१ ते २०१०.११ या वर्षात धनात्मक बदल होउन भुईमुग पिकक्षेत्रामध्ये वाढ झालेल्या जिल्ह्यांमध्ये परभणी +४७.६२ टक्के पिकक्षेत्रामध्ये वाढ झाली. ऋणात्मक बदल होउन लातुर —१४.१ टक्के ,जालना —६.३२ टक्के ,बीड —१६.९३ टक्के ,उस्मानाबाद —३.८७ टक्के, औरंगाबाद —३.३९ टक्के

,नांदेड –३.०४ टक्के पिकक्षेत्रामध्ये घट झाल्याचे दिसुन आले. मराठवाडयातील एकुण भुईमुग पिकाखालील क्षेत्रामध्ये –४४.१४ टक्के घट झाल्याचे निदर्शनास आले.

**१०.करडई पिकाखालील क्षेत्र व झालेला बदल**

१९९०–९१ या वर्षात मराठवाडयातील करडई पिकाखालील क्षेत्रापैकी सर्वाधिक पिकक्षेत्र परभणी जिल्हयात २६.५५ टक्के तर सर्वात कमी पिकक्षेत्र नांदेड जिल्ह्यात ३.२९टक्के होते. २०१०.११ मध्ये सर्वाधिक पिकक्षेत्र परभणी जिल्हयात ३९.९१ टक्के तर सर्वात कमी पिकक्षेत्र औरंगाबाद जिल्ह्यात १.८४ टक्के होते. १९९०.९१ ते २०१०.११ या वर्षात धनात्मक बदल होउन करडई पिकक्षेत्रामध्ये वाढ झालेल्या जिल्ह्यांमध्ये उस्मानाबाद +२२.५ टक्के ,परभणी +१३.२६ टक्के, लातुर +८.७२ टक्के, नांदेड +३.६३ टक्के पिकक्षेत्रामध्ये वाढ झाली. ऋणात्मक बदल होउन औरंगाबाद –२९.९२ टक्के ,जालना –१२.८२ टक्के ,बीड –१३.४७ टक्के पिकक्षेत्रामध्ये घट झाल्याचे दिसुन आले. मराठवाडयातील एकुण करडई पिकाखालील क्षेत्रामध्ये –६४.९८ टक्के घट झाल्याचे निदर्शनास आले.

**११.सुर्यफुल पिकाखालील क्षेत्र व झालेला बदल**

१९९०–९१ या वर्षात मराठवाडयातील सुर्यफुल पिकाखालील क्षेत्रापैकी सर्वाधिक पिकक्षेत्र बीड जिल्हयात ५१.८७ टक्के तर सर्वात कमी पिकक्षेत्र उस्मानाबाद व परभणी जिल्ह्यात होते.२०१०.११ मध्ये सर्वाधिक पिकक्षेत्र उस्मानाबाद जिल्हयात ५५.१३ टक्के तर सर्वात कमी पिकक्षेत्र जालना जिल्ह्यात ०.९६ टक्के होते. १९९०.९१ ते २०१०.११ या वर्षात धनात्मक बदल होउन सुर्यफुल पिकक्षेत्रामध्ये वाढ झालेल्या जिल्ह्यांमध्ये उस्मानाबाद +५५.१३ टक्के ,लातुर +१२.४१ टक्के ,औरंगाबाद +२.०१ टक्के ,परभणी +७.६३ टक्के वाढ झाल्याचे दिसुन आले. ऋणात्मक बदल होउन जालना जिल्हयात –८.१९ टक्के ,नांदेड जिल्हयात –१७.२३ टक्के व बीड जिल्हयात पिकक्षेत्रामध्ये घट झाल्याचे दिसुन आले. मराठवाडयातील एकुण सुर्यफुल पिकाखालील क्षेत्रामध्ये –१.४१ टक्के घट झाल्याचे निदर्शनास आले.

**१२.सोयाबीन पिकाखालील क्षेत्र व झालेला बदल**

सोयाबीन हे पिक मराठवाडयातील पिक प्रारुपात मोठयाप्रमाणावर बदल घडवून आणणारे पिक आहे. सोयाबीन मराठवाड्यातील तेलवर्गीय पिकामध्ये महत्वपुर्ण पिक असुन सर्वात जास्त क्षेत्रावर पेरणी केली जाते. २०१०.११ मध्ये मराठवाड्यातील जिल्हानिहाय पिकाखालील क्षेत्र परभणी ४२.१२ टक्के ,उस्मानाबाद ४०.६४ टक्के ,जालना ११.३४ टक्के ,औरंगाबाद १.८७ टक्के पिकक्षेत्र निदर्शनास आले.

**१३.ऊस पिकाखालील क्षेत्र व झालेला बदल**

१९९०–९१ या वर्षात मराठवाडयातील ऊस पिकाखालील क्षेत्रापैकी सर्वाधिक पिकक्षेत्र औरंगाबाद जिल्हयात २४.४१ टक्के तर सर्वात कमी पिकक्षेत्र जालना जिल्ह्यात ८.२ टक्के होते. २०१०.११ मध्ये सर्वाधिक पिकक्षेत्र लातुर जिल्हयात २८.३ टक्के तर सर्वात कमी पिकक्षेत्र औरंगाबाद जिल्ह्यात १२.०७ टक्के होते. १९९०.९१ ते २०१०.११ या वर्षात धनात्मक बदल होउन ऊस पिकक्षेत्रामध्ये वाढ झालेल्या जिल्ह्यांमध्ये लातुर +१७.७४ टक्के, परभणी +६.६७ टक्के, जालना +४.७२ टक्के वाढ झाल्याचे दिसुन आले. ऋणात्मक बदल झालेल्या जिल्ह्यात औरंगाबाद –१२.३४ टक्के, उस्मानाबाद –१.०२ टक्के ,नांदेड –०.३५ टक्के पिकक्षेत्रामध्ये घट झाल्याचे दिसुन आले. मराठवाडयातील एकुण ऊस पिकाखालील क्षेत्रामध्ये +४.२७ टक्के वाढ झाल्याचे निदर्शनास आले.

### १४. कापुस पिकाखालील क्षेत्र व झालेला बदल

१९९०—९१ या वर्षात मराठवाडयातील कापुस पिकाखालील क्षेत्रापैकी सर्वाधिक पिकक्षेत्र परभणी जिल्हयात ३७.०४ टक्के तर सर्वात कमी पिकक्षेत्र उस्मानाबाद जिल्ह्यात होते. २०१०.११ मध्ये सर्वाधिक पिकक्षेत्र औरंगाबाद जिल्हयात २९.२१ टक्के तर सर्वात कमी पिकक्षेत्र उस्मानाबाद व बीड जिल्ह्यात होते. १९९०.९१ ते २०१०.११ या वर्षात धनात्मक बदल होउन कापुस पिकक्षेत्रामध्ये वाढ झालेल्या जिल्ह्यांमध्ये औरंगाबाद +२०.४ टक्के ,जालना +९.७६ टक्के, उस्मानाबाद +०.१६ टक्के वाढ झाल्याचे दिसुन आले. ऋणात्मक बदल झालेल्या जिल्ह्यात परभणी —१२.३६ टक्के ,नांदेड —११.७९ टक्के, लातुर —२.८८ टक्के पिकक्षेत्रामध्ये घट झाल्याचे दिसुन आले. मराठवाडयातील एकुण कापुस पिकाखालील क्षेत्रामध्ये +३८.८६ टक्के वाढ झाल्याचे निदर्शनास आले.

## निष्कर्ष

१. मराठवाड्यामध्ये पिक प्रारुपात धनात्मक बदल हा गहु,मका,हरभरा,तुर,उडीद,सोयाबीन,ऊस व कापुस या पिकांमध्ये घडुन आला व या पिकांच्या क्षेत्रामध्ये वाढ झाली.

२. मराठवाड्यामध्ये पिक प्रारुपात.ऋणात्मक बदल हा ज्वारी,बाजरी,मुग,भुईमुग,करडई,सुर्यफुल, या पिकांमध्ये घडुन आला व या पिकांच्या क्षेत्रामध्ये घट झाली.

३. मराठवाड्यातील शेतकरी यांचा आर्थिकदृष्टया विचार करता नगदी पिकाकडे कल दिसुन येतो.

## संदर्भ

१. आर्थिक व सामाजिक समालोचन औरंगाबाद,जालना,बीड,लातुर,उस्मानाबाद,नांदेड,परभणी व हिंगोली १९९२.९३,२०१०.११

२. कृषी भूगोल— सुरेश फुले,विद्याभारती प्रकाशन,लातुर

३. कृषी भूगोल— के.ए.खतीब, मेहता बुक सेलर्स,कोल्हापुर.

४. कृषी भू विज्ञान—माजीद हुसेन